RNI No. MAHBIL /2009/31733

Reg. No. MCS/173/2016-18

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ५५] बुधवार, जून ७, २०१७/ज्येष्ठ १७, शके १९३९ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ९०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून २०१७

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एसआरव्ही २०१४/प्र.क्र.३२२/का-१२.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश यांचे अधिक्रमण करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील, सोबत जोडलेल्या अनुसूचीतील गट "ड" पदाच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत, ते असे :—

१. या नियमांना, महाराष्ट्र शासनाच्या विभागातील व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट "ड" पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २०१७, असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, —

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ सोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या पदांवर नेमणुका करण्यास जो सक्षम आहे असा प्राधिकारी.

(ख) "विभाग" याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये निर्दिष्ट केलेले विभाग आणि यामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील इतर कार्यालये देखील अंतर्भूत आहेत.

(ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

(घ) "अनुसूची" याचा अर्थ, या नियमांना जोडलेली अनुसूची.

(च) "माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. अनुसूचीमधील भाग "अ" मध्ये उल्लेख केलेल्या पदावरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(क) अनुसूचीमधील भाग "ब" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरवलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीन; किंवा

(ख) अनुसूचीमधील भाग "क" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या आणि नियम ६ च्या खंड "ख" च्या उप खंड (दोन) मधील विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरवलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने.

४. अनुसूचीमधील "ब" मध्ये उल्लेख केलेल्या पदावरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(क) अनुसूचीमधील "ड" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तीमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरवलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने; किंवा

(ख) अनुसूचीमधील "क" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या आणि नियम ६ च्या खंड "ख" च्या उप खंड (दोन) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने.

५. अनुसूचीमधील भाग "क" मध्ये उल्लेख केलेल्या पदांवरील नेमणुका अनुसूची मधील भाग "इ" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या योग्य व्यक्तींमधून ज्येष्ठता अधीन पात्रता या आधारावर पात्र ठरलेल्या योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने करता येतील.

६. अनुसूचीमधील भाग "ड " मध्ये उल्लेख केलेल्या पदावरील नेमणुका पुढीलपैकी कोणत्याही मार्गाने करता येतील :—

(क) अनुसूचीमधील भाग "इ" मध्ये नमूद केलेले पद धारण करणा-या आणि या नियमाच्या खंड "ख" च्या उप खंड (दोन) मधील शैक्षणिक अर्हता धारण करीत असलेल्या योग्य व्यक्तींच्या बदलीने; किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे,—

(एक) खुल्या वर्गातील व्यक्तींसाठी १८ वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या; आणि

(दोन) ज्यांनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे ;

परंतु नियुक्ती प्राधिका-यास जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्तीवेतनधारक असतील अशा उमेदवारांच्याबाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

७. अनुसूचीमधील "इ" मध्ये उल्लेख केलेल्या पदावर पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करता येईल :—

(एक) खुल्या वर्गातील व्यक्तींसाठी १८ वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या आणि मागासवर्गीय व्यक्तींसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या; आणि

(दोन) ज्याला शासनाने किंवा इतर प्राधिका-याने मान्यता दिलेल्या शाळेतून इयत्ता सातवीमधून बढती दिलेली आहे;

परंतु नियुक्ती प्राधिका-यास जे माजी सैनिक किंवा लष्करी सेवेचे निवृत्तीवेतनधारक असतील अशा उमेदवारांच्याबाबतीत कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल.

८. वरील नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूचीमध्ये उल्लेख केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर आवश्यकतेनुसार शासनास योग्य वाटतील असे विशेष अथवा सर्वसाधारण आदेश निर्गमित करून त्यामध्ये वेळोवेळी निर्देशित केलेल्या पद्धतीनुसार विशेष परिस्थितीत सेवाभरती करता येईल.

## अनुसूची

(गट "ड" सेवेतील पद)

| अ.क्र. | पदनाम |
|---|---|
| | **भाग-अ** |
| १ | जमादार |
| २ | चोपदार |
| | **भाग-ब** |
| ३ | हवालदार |
| ४ | नाईक |
| ५ | उद्वाहन चालक |
| ६ | आवेष्टक |
| ७ | फाईलकरी |
| ८ | दफ्तरी |
| ९ | दप्तरबंद |
| १० | रोनिओ शिपाई/रोनिओ चालक |
| ११ | मुकादम |
| १२ | दारवान |
| १३ | झेरॉक्स ऑपरेटर |
| | **भाग-क** |
| १४ | स्वच्छक मुकादम |
| १५ | सफाईगार मुकादम |
| | **भाग-ड** |
| १६ | शिपाई |
| १७ | सहायक दारवान |
| १८ | संदेशवाहक |
| | **भाग-इ** |
| १९ | स्वच्छक |
| २० | सफाईगार |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मुकेश खुल्लर,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

क्रमांक एसआरव्ही-२०१४/प्र.क्र.३२२/का.१२
**सामान्य प्रशासन विभाग,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ६ जून २०१७.

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०. *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११. *प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४. *प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद) मुंबई,
१५. *सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई,
१७. *महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१८. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
१९. *महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
२०. *सचिव, राज्य मुख्य माहीती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
२१. *प्रबंधक, राज्य मानवी हक्क आयोग, मुबंई ४०० ००१,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (२ प्रती प्रसिद्धीकरिता)
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. सर्व विभागीय आयुक्त,
२६. सर्व जिल्हाधिकारी,
२७. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३०. सामान्य प्रशासन विभाग/का.३९ (महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीकरिता),
३१. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६ मजला, विधान भवन, मुंबई. (१०प्रती)
३२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३३. निवडनस्ती.

(*पत्राने)

**सु. ह. उमराणीकर,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 6th June 2017

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. SRV. 2014/CR-322/Desk-12.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating the recruitment to the post in Group "D" services mentioned in the schedule appended hereto, in the Departments of the Government of Maharashtra and the offices thereunder, namely :—

1. These rules may be called the Group "D" posts in the Departments of the Government of the Maharashtra and the offices thereunder (Recruitment) Rules, 2017.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" in relation to the posts specified in the Schedule, means the authority competent to make the appointment to the said posts ;

(*b*) "Department" means the Department specified in the First Schedule to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India and includes the offices covered thereunder ;

(*c*) "Government" means the Government of Maharashtra ;

(*d*) "Schedule" means the Schedule appended to these rules ;

(*e*) "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Boards constituted under the Maharashtra Secondary and Higher Secondary Education Boards Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by the Government to be equivalent thereto.

3. Appointment to the posts mentioned in Part "A" of the Schedule shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person with due regard to seniority subject to fitness from amongst the persons holding the post mentioned in Part "B" of the Schedule having not less than three years of regular service on that post; or

(*b*) by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post mentioned in Part "C" of the Schedule having not less than three years of regular service on that post and possessing the educational qualifications specified in sub-clause (*ii*) of clause (*b*) of rule 6.

4. Appointment to the post mentioned in Part "B" of the schedule shall be made either —

(*a*) by promotion of a suitable person, with due regard to seniority subject to fitness, from amongst the persons holding the post mentioned in Part "D" of the schedule having not less than three years of regular service on that post; or

(*b*) by transfer of suitable person from amongst the persons holding the post mentioned in Part "C" of the Schedule and possessing the educational qualifications specified in sub-clause (*ii*) of clause (*b*) of rule 6.

5. Appointment to the posts mentioned in Part "C" of the Schedule shall be made by promotion of suitable person, with due regard to seniority subject to fitness, from amongst the persons holding the post mentioned in Part "E" of the Schedule having not less than three years of regular service on that posts.

6. Appointment to the posts mentioned in Part "D" of the Schedule shall be made either,–

(*a*) by transfer of suitable person from amongst the person holding the post mentioned in Part "E" of the schedule and possessing the educational qualifications specified in sub-clause (*ii*) of clause (*b*); or

(*b*) by nomination from amongst the following candidates who,—

(*i*) are not less than eighteen years of age and not more than thirty eight years of age in case of persons belonging to general class; and not more than forty three years of age in case of persons belonging to backward class; and

(*ii*) have passed Secondary School Certificate Examination :

Provided that, the Appointing Authority may relax the upper age limit upto forty five years in favour of candidate who is ex-serviceman or military pensioner.

7. Appointment to the posts mentioned in Part "E" of the Schedule shall be made by nomination from amongst the persons who,—

(*i*) are not less than eighteen years of age and not more than thirty eight years of age in case of persons belonging to general class; and not more than forty three years of age in case of persons belonging to backward class; and

(*ii*) have promoted from the Seventh standard from a School recognized by any authority or the Government :

Provided that, the Appointing Authority may relax the upper age limit upto forty five years in favour of a candidate who is ex-serviceman or military pensioner.

8. Notwithstanding anything contained in the foregoing rules, recruitment to any of the posts mentioned in the Schedule, in special circumstances, may be made in such manner as the Government may deem necessary and as it directs from time to time, by issuing special or general orders in this behalf.

*Schedule*

(Posts in Group "D" Services)

| Serial Number (1) | Designation of post (2) |
|---|---|
| **Part A** | |
| 1. | Jamadar |
| 2. | Chopdar |
| **Part B** | |
| 3. | Havaldar |
| 4. | Naik |
| 5. | Liftman |
| 6. | Binder |
| 7. | Filer |
| 8. | Daftari |
| 9. | Daftarband |
| 10. | Roneo peon/ Roneo Operator |
| 11. | Mukadam |
| 12. | Gate-Keeper |
| 13. | Xerox Operator |
| **Part C** | |
| 14. | Cleaner Mukadam |
| 15. | Sweeper Mukadam |
| **Part D** | |
| 16. | Peon |
| 17. | Assistant Gate-Keeper |
| 18. | Messenger |
| **Part E** | |
| 19. | Cleaner |
| 20. | Sweeper |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MUKESH KHULLAR,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

No. SRV. 2014/C.R. 322/Desk-12

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032

dated 6th June 2017

To,

1. The Secretary to the Governor, Raj Bhavan, Malbar Hill, Mumbai,
2. The Principal Secretary to the Chief Minister,
3. The Private Secretary to all Ministers/State Ministers,
4. Hon'ble Opposition Leader, Legislative Council of the State of Maharashtra/ Legislative Assembly of the State of Maharashtra,
5. All Hon'ble Members of the Parliament/Members of the Legislative Council of the State of Maharashtra/ Members of the Legislative Assembly of the State of Maharashtra,
6. The Chief Secretary,
7. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Mantralaya Departments,
8. All Mantralaya Departments,
9. *The Registrar, High Court (Original Side), Mumbai,
10. *The Registrar, High Court (Appellate Side), Mumbai,
11. *The Registrar, Office of the Loka Ayukta and Upa-Loka Ayukta, Mumbai,
12. *The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,
13. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Assembly), Mumbai,
14. *The Principal Secretary, Secretariat of Maharashtra Legislature (Council), Mumbai,
15. *The Secretary, State Election Commission, New Administrative Building, Mumbai,
16. *The Accountant General, Maharashtra-1 (Account and Entitlement), Maharashtra, Mumbai,
17. *The Accountant General, Maharashtra-1 (Audit), Maharashtra, Mumbai,
18. *The Accountant General, Maharashtra-2 (Account and Entitlement), Maharashtra, Nagpur,
19. *The Accountant General, Maharashtra-2 (Audit), Maharashtra, Nagpur,
20. *The Secretary, Office of the Chief Information Commissioner of the State, New Administrative Building, Mumbai,
21. *The Registrar, State Human Rights Commission, Mumbai 400 001,
22. The Director General of Information and Public Relations, Mumbai, (2 copies for publicity)
23. Pay and Accounts Officer, Mumbai,
24. Resident Audit Officer, Mumbai,
25. All Divisional Commissioners,
26. All Collectors,
27. All Chief Executive Officers of Zilla Parishads,
28. All District Treasury Officers,
29. All Heads of Departments and Heads of Offices under the All Departments of Mantralaya,
30. General Administration Department/Desk 39 (For publishing on website),
31. The Librarian, Secretariat of Maharashtra Legislature, Library, 6th Floor, Vidhan Bhavan, Mumbai 400 032 (10 copies),
32. All Desks of General Administration Department,
33. Select File.

---

(* By Letter)

S. H. UMRANIKAR,

Deputy Secretary to Government.